क्रमांक : मप्रशावि/संकीर्ण-COR-12/ 91 /३ सन् २०१३

महाप्रशासक आणि शासकीय विश्वस्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
दुसरा मजला, जुने सचिवालय (विस्तारगृह),
एलफिन्स्टन कॉलेजच्या बाजूला,
महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १६ मार्च, २०१३

प्रति,
कार्यासन अधिकारी,
कार्यासन - ०७,
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- नागरिकांची सनद प्रसिध्द करणे हा विषय सन् २०१२-२०१३ साठीच्या KRA मध्ये प्रसिध्द करणे.

संदर्भ :- शासन (विधी व न्याय विभाग) पत्र क्रमांक केआरए-२०१२/ प्र.क्र. १०/का.०७, दिनांक १७ जानेवारी, २०१३

महोदय,

उपरोक्त विषयांकित आपल्या संदर्भाधिन पत्रास अनुसरुन, हया कार्यालयाची माहिती सोबत पाठविण्यात येत आहेत.

कृपया पोहोच द्यावी.

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE
MAHARASHTRA STATE

आपला,

(वी.ग्या. बिष्ट)
(प्र.) महाप्रशासक आणि शासकीय विश्वस्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत : वरीलप्रमाणे

महाप्रशासक आणि शासकीय विश्वस्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
दुसरा मजला, जुने सचिवालय (विस्तारगृह),
एलफिन्स्टन कॉलेजच्या बाजूला,
महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२

# नागरिकांची सनद (CITIZEN CHARTER)

**प्रस्तावना** :-

महाप्रशासक आणि शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाचे कामकाज केंद्र शासनाच्या (१) महाप्रशासक अधिनियम, १९६३, (२) शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३ आणि कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० या तीन अधिनियमांन्वये चालते.

(अ) **महाप्रशासक म्हणून** :-

महाप्रशासक हे महाप्रशासक अधिनियम, १९६३ अन्वये महाराष्ट्र राज्याकरिता नियुक्त झालेले एक निगम असून, त्यांचे काम न्यायिक आणि प्रशासकीय असे संमिश्र आहे.

सदर अधिनियमाच्या सुधारित कायदा १२ सन् २००२ अनुसार महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे रु. १०,००,०००/- पर्यंतच्या संपत्तीचे प्रशासन स्वतःच्या प्राधिकारात करु शकतात आणि रु. १०,००,०००/- च्या वरील संपत्तीचे प्रशासन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने करु शकतात.

कुठलीही व्यक्ती महाप्रशासकांना त्यांच्या इच्छापत्राचा / मृत्यूपत्राचा एकमेव प्रशासक म्हणून नेमू शकते. जेव्हा मृत व्यक्तीचे वारसदार भारताबाहेर राहात असतील आणि इतर कारणास्तव त्यांना मृत व्यक्तीची संपत्ती प्रशासन करण्यास वेळ उपलब्ध नसेल, अशा वेळेस वारसदारांनी महाप्रशासकांना लेखी कळविले तर, महाप्रशासक प्रशासनपत्रासाठी उच्च न्यायालयात अर्ज करु शकतात. कुठलेही खाजगी व्यवस्थापक / प्रशासक यांना मृत्यूपत्राचे सत्यापन किंवा प्रशासन अधिकारपत्रांन्वये सोपविलेली संपत्ती महाप्रशासकांकडे त्यांच्या पूर्व-संमतीने हस्तांतर करु शकतात. सूट दिलेल्या व्यक्ती सोडून, इतर व्यक्तींच्या संपत्तीचे प्रशासक म्हणून महाप्रशासक प्रशासन अधिकारपत्रासाठी अर्ज करु शकतात (सूट दिलेल्या व्यक्ती म्हणजे भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ च्या कलम ३ अन्वये भारतीय ख्रिश्चन, हिंदू, मुसलमान, पारसी किंवा बौध्द व्यक्ती ज्यांना ते अधिनियम लागू होण्यापासून सूट दिली आहे). मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे राज्यात स्थित असलेल्या संपत्तीचे मूल्य रु. १०,००,०००/- पर्यंत असेल आणि

मृत्यूपत्रांन्वये नियुक्त केलेले वारस, निकट कुळातील व्यक्ती किंवा मृत्यूपत्र व्यवस्थापक यांनी महाप्रशासक यांचेकडे प्रमाणपत्रासाठी विहीत नमुन्यात अर्ज करावयाचे राहून गेले असेल, अशा प्रकरणात महाप्रशासक स्वतःच्या अधिकारात प्रशासनपत्राशिवाय प्रशासनपत्र दिले आहे असे समजून, संपत्तीचे प्रशासन करु शकतील. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतूदीनुसार पोलीस विभाग किंवा इतर माध्यमांद्वारे मिळालेल्या माहितीनुसार संपत्ती ताब्यात घेऊन, मा. उच्च न्यायालयाकडून तिचे प्रशासन करण्यासाठी प्रशासन अधिकारपत्र कमी वेळात आणि कमी खर्चात प्राप्त करु शकतात. तत्पश्चात मृत व्यक्तींच्या वारसांबाबत माहिती मिळाली तर योग्य शहानिशा करुन, त्या वारसांना मृताच्या संपत्तीचे प्रदान केले जाते. जर मृताचे वारस अज्ञान असतील तर ते सज्ञान होईपर्यंत संपत्तीचे प्रशासन केले जाते. तसेच, मृत पावलेल्या व्यक्तीची संपत्ती मुंबई उच्च न्यायालयाच्या साधारण किंवा असाधारण अधिकार क्षेत्रात असेल व प्रशासनपत्राअभावी अशा संपत्तीची अफरातफर / -हास किंवा उधळण्याचा धोका असेल अशा प्रकरणात महाप्रशासक मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने प्रशासनपत्र प्राप्त करण्यासाठी अर्ज करु शकतात.

या व्यतिरिक्त महाप्रशासक अधिनियम, १९६३ च्या कलम २९ अन्वये महाप्रशासक मृत व्यक्तीच्या रु. १०,००,०००/- पर्यंतच्या मूल्याच्या संपत्तीकरिता (शासकीय बचत खाते व भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ खाली अंतर्भूत भविष्य निर्वाह निधी वगळता) मृताची पत्नी, मुले, मृत्यूपत्राने नियुक्त केलेले वारस किंवा संपत्ती प्रशासन करणारी व्यक्ती यांनी विहीत नमुन्यात केलेल्या अर्जानुसार महाप्रशासकांचे प्रमाणपत्र देऊ शकतात.

ब) **<u>शासकीय विश्वस्त म्हणून</u>** :- समाजातील कोणत्याही ज्ञातीच्या कोणत्याही व्यक्तीला शासकीय विश्वस्तांना (त्यांच्या संमतीने) न्यास करार किंवा न्यासाचे दस्तऐवज तयार करुन आपल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून नेमता येते. शासकीय विश्वस्तांनी संपत्तीचे प्रशासन करावे आणि विश्वस्त म्हणून काम पहावे असे वाटले तर ते शासकीय विश्वस्तांना मृत्यूपत्रांन्वये एकमात्र व्यवस्थापक म्हणून नेमू शकतात. समाजातील कुठल्याही ज्ञातीचे कुठल्याही व्यक्तीला मृत्यूपत्रांन्वये खाजगी व्यक्तीला व्यवस्थापक आणि शासकीय विश्वस्तांना विश्वस्त म्हणून नेमता येते. मुंबई उच्च न्यायालयाच्या साधारण किंवा असाधारण दिवाणी अधिकार क्षेत्रात असलेले असे न्यास की ज्यांच्यांमध्ये संपत्ती आहे, परंतू त्या संपत्तीचे प्रशासन / व्यवस्थापन करण्यासाठी विश्वस्त नाहीत किंवा असेलेले विश्वस्त न्यासाचे काम सांभाळण्यास असमर्थ आहेत, अशा प्रकरणात, मा. उच्च न्यायालय, शासकीय विश्वस्तांना त्यांच्या संमतीने न्यासाच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून नेमू शकते.

तसेच शासकीय विश्वस्तांना त्यांच्या संमतीने निवृत्त होणा-या विश्वस्तांच्या जागी बदली विश्वस्त म्हणून, अज्ञान किंवा मनोरुग्णाच्या वारसातील हिस्सा / भाग / वाटा किंवा बक्षीस यांचे विश्वस्त म्हणून व सार्वजनिक / अर्ध-सार्वजनिक निधीचे (भविष्य निर्वाह निधी / ज्ञातीच्या संस्थांचे निधी, धर्मादाय किंवा लोककल्याणासाठी स्थापन

झालेल्या संस्थांचे निधी ) विश्वस्त म्हणून नियुक्त करता येते.

क) **कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी म्हणून** :-

वरील कार्याव्यतिरिक्त, महाप्रशासक आणि शासकीय विश्वस्त यांची दिनांक १ फेब्रुवारी, १९७७ पासून धर्मादाय आयुक्त यांच्या जागी कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अभिकर्ता कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी भारताकरिता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दाननिधीच्या संबंधात कर्जरोख्यांवरील / मुदतठेवींवरील व्याज वसूल करुन ते दाननिधीच्या प्रशासकांना वाटणी करण्याचे काम ते करतात.

कोणत्याही व्यक्तीला संबंधित सरकारी खात्याकडे अर्ज करुन, दाननिधीची स्थापना करता येते (उदा. दाननिधीचा उद्देश जर शैक्षणिक असेल तर शिक्षण खात्याकडे, दाननिधीचा उद्देश जर वैद्यकीय असेल तर आरोग्य खात्याकडे ) व तद्नंतर दाननिधीचा फंड वरील गोष्टींकरिता कोषाध्यक्षांकडे देण्यात येतो.

२) **विभागाचे काम / विभागाच्या अखत्यारितील असलेल्या कार्यालयाचे काम** :-

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता कार्यरत एकमेव कार्यालय असून, या कार्यालयाचे न्यायिक आणि प्रशासकीय असे संमिश्र स्वरुपाचे काम प्रस्तावनेत नमूद केलेल्या केंद्र शासनाच्या तिन्ही अधिनियमांनुसार व त्यानुसार कामकाज करण्यासाठी केलेल्या नियमावल्यांनुसार चालते.

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE
MAHARASHTRA STATE

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा-या सेवा (स्तर नमूद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (संवर्गनिहाय प्राधिका-याचे नांव नमूद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहीत / सर्वसाधारण) | अपील असल्यास, अपीलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहीत कालावधी | सेवा पुरविल्या नसल्यास, तक्रार असल्यास ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | महाप्रशासक आणि शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई अभिकर्ता, कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी भारताकरिता. | महाप्रशासक म्हणून :-<br>(संपत्ती प्रशासन ) :<br>महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य हे मयत व्यक्तींच्या रु.१०,००,०००/- पर्यंतच्या मूल्याच्या संपत्तीचे स्व-आदेशाने आणि रु. १०,००,०००/- वरील मूल्याच्या संपत्तीचे मा. उच्च न्यायालयाचे आदेशाने प्रशासन करतात. तसेच, एखादी विदेशी व्यक्ती भारतात मयत झाल्यास किंवा भारतीय व्यक्ती परदेशात मृत झाल्यास, त्यांच्या संपत्तीचे प्रशासनही महाप्रशासक अधिनियमाच्या कलम ५६ अनुसार संबंधित देशांच्या राजदूतांमार्फत महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य करु शकतात. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ८२, ८३ अन्वये संबंधित पोलीस ठाण्यांकडून आलेल्या बेवारस मयत व्यक्तींच्या संपत्तीचे प्रशासन करणे. त्यासाठी :-<br>१) कोणीही नागरिक व्यक्तिशः | १) संबंधित व्यक्तीचा रु.१५/- च्या न्यायालयीन मुद्रांकांसह विनंती अर्ज<br>२) आवश्यक तेथे मा. उच्च न्यायालयाचे आदेश महाप्रशासक अधिनियम, १९६३ मधील तरतूदींनुसार प्राप्त करणे.<br>३) रु. २००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर अर्जदारांकडून बंधपत्र (इंडेम्निटी ) घेणे.<br>४) रु. १००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेणे.<br>५) प्रदान करताना, | १) श्री. वी.ग्या. बिष्ट महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (विभागप्रमुख, न्यायिक आणि प्रशासकीय अधिकारी)<br>२) श्री. रा.सं. कदम सहाय्यक संचालक<br>अ) श्री. ता.ग.टपाल अधिक्षक<br>ब) श्री. बा.भि. आंबेकर, सहाय्यक लेखा अधिकारी<br>३) श्री. हे.रा. गावीत, लिपीक-टंकलेखक आणि<br>४) श्री. सु.म. परकर, सहाय्यक | सदरहू बाबतीत प्रक्रियेस किती वेळ लागेल हे ठरविता येणार नाही. कारण सदरहू बाब, स्तंभ क्रमांक ४ च्या कागदपत्रांवर अवलंबून आहे.<br>तथापि, कागदपत्रे उपलब्ध झाल्यास, -७- दिवसांत प्रकरण निकालात काढले जाईल.<br>गुंतवणूकीकरिता -७- दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात येत आहे. | आवश्यकतेनुसार महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे करावे लागते.<br>अथवा<br>मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे करावे लागते.<br>(मात्र ह्याबाबत अधिनियमात कालावधी निश्चित केलेला नाही.) | महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>पत्ता :<br>दुसरा मजला, जुने सचिवालय (विस्तारगृह), एलफिन्स्टन कॉलेजच्या बाजूला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ |

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE MAHARASHTRA STATE

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाप्रशासकांना भेटल्यास , त्यांना संपत्ती प्रशासनाची माहिती पुरवून, चर्चा करुन मार्गदर्शन करणे.<br>२) एखाद्या मयत व्यक्तीच्या अज्ञान मुलांकरिता त्यांचे पालकत्वाबाबत त्यांचे नातेवाईक किंवा जवळच्या व्यक्ती यांना बोलावून कायदेशीर पालकत्वाचे कागदपत्र बनवून घेण्याकरिता मार्गदर्शन करणे.<br>३) अज्ञान मुलास, त्यांचे आई-वडिलांचे संपत्तीमधील खात्यामधून, दरमहा देखभालीकरिता ठराविक रक्कम पुरविणे व मुले सज्ञान झाल्यानंतर, महाप्रशासकांचे किंवा मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार योग्य ते कागदपत्र प्राप्त करुन, संपती प्रदान करणे.<br>४) वारसदारांना संपत्ती प्रशासनाचे कागदपत्र / खातेनिहाय कागदपत्र यांची पहाणी करण्यास परवानगी देऊन, त्यांची खात्री पटविणे.<br>५) बेवारस संपत्तीमधील वारसदार असल्यास, त्यांचेकडून आवश्यकता वाटल्यास, वारस प्रमाणपत्र किंवा बंधपत्र घेऊन संपत्तीचे प्रदान करणे.<br>६) संपत्तीच्या प्रशासनाचे खातेनिहाय अहवाल संबंधित व्यक्तीने मागितल्यास, त्यांना ते | आवश्यक त्या पावत्या संबंधित नियमांवलीनुसार घेणे(रु. ५०००/- वरील प्रदानाचे पावतीस रु.१/- चा रेव्हेन्यू स्टॅम्प)<br>६) संपत्ती प्रशासनाचे खाते निहाय अहवाल पूर्ण करणे.<br>७) वकीलांची सेवा असल्यास, त्यांची बिले अदा करणे.<br>८) जाहिरातदाराचे रिसीटस, बिले प्रदानाकरिता,<br>९) मौल्यवान वस्तू असल्यास, व्हॅल्युएशन रिपोर्ट इत्यादि करणे.<br>१०) संपत्ती खात्यातील असलेल्या समभाग / रोखे व इतर रोख स्वरुपातील रकमेची गुंतवणूक करणे, त्याचे लेखे ठेवणे.<br>११) गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे. | | | | |

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE MAHARASHTRA STATE

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरविणे.<br>७) बेवारस संपत्तीबाबत जाहिरातीच्या माध्यमाद्वारे वारसदारांचे हक्क मागवून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे.<br>८) तसेच, नियतठेवी, समभाग, कर्जरोखे, युनिटस इत्यादि गुंतवणूक करुन व्याज प्राप्त करुन घेणे व लाभधारकांना व्याज अदा करणे. | | | | | |
| ०२. | वरीलप्रमाणे | महाप्रशासक म्हणून (वारसाहक्क / महाप्रशासकांचे प्रमाणपत्र पारित करणे) :-<br>महाप्रशासक अधिनियम, १९६३ सुधारित (महाराष्ट्र) अधिनियम, १२ सन् २००२चे कलम २९ मधील तरतूदीनुसार महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य हे मृत व्यक्तीच्या रु.१०,००,०००/- पर्यंतच्या मूल्याचे संपत्तीकरिता मृत व्यक्तीच्या वारसदारांना ते कोठेही महाराष्ट्र राज्यात राहात असले तरीही महाप्रशासकांचे प्रमाणपत्र देऊ शकतात.<br>तसेच, सदरील महाप्रशासक अधिनियम, १९६३ मधील कलम ३३ च्या तरतूदीनुसार वरीलप्रमाणे कलम २९ अन्वये पारित केलेले प्रमाणपत्र, महाप्रशासकांची दिशाभूल करुन/ चुकीची माहिती देऊन किंवा लबाडीने घेतलेले | १) रु. १००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर अर्जदाराचे शपथपत्र<br>२) इतर वारसदारांचे संमतीपत्र रु. १००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर<br>३) शुअरिटी बॉंड (रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर)<br>४) जोडशपथपत्र आणि त्रूटी पूर्तता शपथपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर<br>५) बंधपत्र रु. २००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प | १) श्री. वी.ग्या. बिष्ट महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (न्यायिक अधिकारी)<br>२) श्री. प्र.जा. थोरात | संबंधित अर्जातील सर्व त्रूटी पूर्ण झाल्यानंतर किमान १५ दिवस आणि जास्तीत जास्त एक महिना. मात्र काम हे न्यायिक स्वरुपाचे असल्याने, कालावधी निश्चित करता येत नाही. परंतू कामाचा निपटारा होण्याची प्रक्रिया पूर्णत्वास जाते. | महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>(यासाठी कालावधी निश्चित करता येत नाही. कारण तक्रारदाराच्या निदर्शनास आल्यानंतर केव्हांही महाप्रशासकांकडे अपील केले जाते.) | वरीलप्रमाणे |

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE MAHARASHTRA STATE

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आढळल्यास, ते रद्द करण्याचे प्राधिकारही महाप्रशासकांनाच आहेत. | पेपरवर<br>६) जाहिरात<br>७) संपत्तीच्या मूल्याचे ५ टक्के एवढे प्रमाणपत्र शुल्क महाप्रशासक, महाराष्ट्र राज्य यांचे नांवे काढलेल्या डिमांड ड्राफटद्वारे<br>८) पिटीशन संबंधी लागणारे कागदपत्रांचे नमुने कार्यालयाने दिल्याप्रमाणे<br>९) पारित केलेले प्रमाणपत्र रद्द करावयाचा तक्रार अर्ज<br>रु. १५/- चा न्याय मुद्रांक (कोर्ट फी) लावून | | | | |
| ०३. | वरीलप्रमाणे | शासकीय विश्वस्त म्हणून (न्यास प्रशासन ) :-<br>शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३ मधील तरतूदीनुसार, शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य हे न्यासांचे प्रशासन करतात. सदर अधिनियमानुसार कार्य करण्यासाठी केलेल्या नियमावलीत नमूद केल्याप्रमाणे :-<br>१) विश्वस्त निधीमधील लेख्यांचे कॉपी ऑफ अकाऊंट देणे. | १) संबंधित व्यक्तीचे विनंती अर्ज रु.१५/- न्याय मुद्रांक (कोर्ट फी) लावून,<br>२) आवश्यक तेथे मा. उच्च न्यायालयाचे आदेश, शासकीय विश्वस्त अधिनियमातील तरतूदीनुसार प्राप्त करुन घेणे. | १) श्री. वी.ग्या. बिष्ट शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (न्यायिक आणि प्रशासकीय अधिकारी)<br>२) श्री. रा.सं. कदम सहाय्यक संचालक<br>अ) श्री. ता.ग.टपाल अधिक्षक<br>ब) श्री. बा.भि. | सदरहू बाबतीत प्रक्रियेस किती वेळ लागेल हे ठरविता येणार नाही. कारण सदरहू बाब, स्तंभ क्रमांक ४ च्या कागदपत्रांवर अवलंबून आहे.<br>तथापि, कागदपत्रे उपलब्ध झाल्यास, -७- दिवसांत प्रकरण | आवश्यकतेनुसार, शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे करावे लागते.<br>अथवा<br>मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे करावे लागते. | शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि तद्नंतर विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई |

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE MAHARASHTRA STATE

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २) हक्कदारांस इन्कम सर्टिफिकेट देणे.<br>३) विश्वस्त निधीमधील खात्याचे वार्षिक होल्डींग सर्टिफिकेट देणे.<br>४) न्यासातील इन्कम देणे.<br>५) मागणी केल्यास ट्रस्ट डीडच्या कॉपीज देणे.<br>६) ट्रस्ट फंड गुंतवणूकीकरिता सूचना देणे.<br>७) नियत ठेवी, समभाग, कर्जरोखे, युनिट इ. गुंतवणूक करुन व्याज प्राप्त करुन घेणे व लाभधारकांना अदा करणे.<br>८) न्यासधारकांचे वारसाच्या इच्छेनुसार त्यांना ट्रस्ट फंड योग्य त्या सर्व कार्यवाही करुन हस्तांतर करणे.<br>९) त्याप्रमाणे संबंधितांना न्यायिक बाबतीत मार्गदर्शन करणे.<br>१०) आवश्यकता वाटल्यास, शासकीय विश्वस्त यांचेकडे सभा बोलावून मार्गदर्शन / सल्ला इत्यादि देणे.<br>११) न्यासधारकांचे संबंधितांना गरज वाटल्यास, संबंधित न्यासातील कार्यालयातील कागदपत्र पाहाणीस तपासणीकरिता देणे. | ३) रु. २००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर बंधपत्र (इंडेम्निटी बॉंड) : सात दिवस<br>४) प्रदानाकरिता आवश्यक त्या रिसीटस घेणे : सात दिवस<br>५) आवश्यकता वाटल्यास, रु. १००/- च्या नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेणे.<br>६) न्यासाचे खातेनिहाय अहवाल पूर्ण करणे.<br>७) वकीलांची सेवा असल्यास, त्यांच्या देयकांचे प्रदान करणे : सात दिवस<br>८) मौल्यवान वस्तू असल्यास, त्यांचा व्हॅल्युएशन रिपोर्ट घेणे. | आंबेकर, सहाय्यक लेखा अधिकारी<br>३) सौ. अ.सु. सोनावणे<br>श्री. गि.भा. नाईक (सहाय्यक)<br>श्रीमती वि.नि. बिडकर, लिपीक-टंकलेखक<br>श्री. गिरीश जवळेकर, लिपीक-टंकलेखक आणि<br>श्री. सु.म. परकर, सहाय्यक | निकालात काढले जाईल.<br>गुंतवणूकीकरिता -७- दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात येत आहे. | | |
| ०४. | वरीलप्रमाणे (अ.क्र. १ प्रमाणे) | कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी, महाराष्ट्र राज्य, शासकीय विश्वस्त, | दाननिधीच्या प्रशासकांना | १) श्री. रा.सं. कदम, सहाय्यक संचालक, | पोहोच पावती प्राप्त झाल्यानंतर साधारण | कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी, महाराष्ट्र | प्रथम कोषाध्यक्ष धर्मादाय |

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE MAHARASHTRA STATE

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र राज्य, मुंबई अभिकर्ता कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी भारताकरिता म्हणून :- कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० अनुसार शासनामार्फत (केंद्र व राज्य) जे दाननिधी या कार्यालयाकडे प्रशासनासाठी येतात किंवा देण्यात आलेले आहेत,त्यातील मूळ निधीची गुंतवणूक करुन उत्पन्नरुपी व्याज प्रस्थापित आदेशानुसार उद्दिष्टपूर्तीकरिता संबंधितांस अदा करणे. | कार्यालयातील विहीत नमुन्यातील पोहोच पावती | कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी, महाराष्ट्र राज्य, शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई अभिकर्ता कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी भारताकरिता<br>२) श्री. वि.चा. गायकवाड, उपलेखापाल आणि<br>३) श्री. अ.बा. कडू सहाय्यक | दहा दिवसांत | राज्य, शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई अभिकर्ता कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी भारताकरिता | दाननिधी, महाराष्ट्र राज्य, शासकीय विश्वस्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई अभिकर्ता कोषाध्यक्ष धर्मादाय दाननिधी भारताकरिता<br>आणि तद्नंतर<br>विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई |

ADMINISTRATOR GENERAL AND OFFICIAL TRUSTEE ★ MAHARASHTRA STATE ★

महाप्रशासक व शासकीय विश्वस्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई